# शासकीय तंत्रनिकेतन कोल्हापूर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)
विद्यानगर, कोल्हापूर ४१६००४
फोन – (०२३१) २६२१०३८, फॅक्स २६२१०१६
E-mail : gpkolhapur@yahoo.com


जा.क्र.शातंनिको/विवि/२०२४-२५/ 1696 दि- 25 JUN 2024

## परिपत्रक –

विषय – महाडिबीटी पोर्टलवरील प्राचार्याच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या Right to Give UP Revert (शिष्यवृती सोडून देणेचा अधिकार) करण्याच्या पर्यायाबाबत...

संदर्भ – १.) मा.संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचलनालय,मुंबई यांचे पत्र क्र.१८/तंशिसं/विकाप/ Right-to Give- Up /23-24/270 दि २०/०६/२०२४.

२.) सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.साप्रवि-२०२३/प्र.क्र.६२/रो १/३९, दि.०३/०१/२०२४ च्या शासन निर्णयाचे अवलोकन करावे

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाआयटीकडून महाडिबीटी पोर्टलवर शासन योजनांच्या लाभासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्येए अर्ज भरण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये Right to Give Up पर्यायाचे बटन उपलब्ध करून देण्यात आलेले होते.

महाडीबीटी पोर्टलवर योजनांच्या लाभासाठी अर्ज सादर केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या लॉगीनमध्ये Right to Give Up या बटनाचा पर्याय उपलब्ध करुन दिल्यानंतर काही विद्यार्थ्यांनी नजर चुकीने किंवा अर्थ न समजल्याने Right to Give Up बटनाचा वापर केल्याने व अशा विद्यार्थ्यांना परत अर्ज भरता येत नसल्या करणाने विद्यार्थी शासनाच्या योजनेच्या लाभापासून वंचित राहात होते.

अनुषंगाने Right to Give Up पर्यायाच्या बटनाबाबत विद्यार्थी/संस्था यांच्याकडून विद्यार्थ्याने नजर चुकीने Right to Give Up (शिष्यवृती लाभ नाकारणेचा अधिकार) बटनाचा वापर झाला असल्यास सदर विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विभागात येऊन आपले अर्ज दि. ३०/०६/२०२४ पर्यंत Right to Give Revert करुन घ्यावेत. जेणेकरुन सदर विद्यार्थी शिष्यवृत्ती पासून वंचित राहणार नाही.

ज्या विद्यार्थ्यांकडून Right to Give Up बटनाचा वापर झाला असून अशा विद्यार्थ्यांनी वरील तारखेपर्यंत Right to Give Revert करून घेणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना त्या- त्या वर्षाचे संपूर्ण शैक्षणिक शुल्क भरावे लागेल याची नोंद घ्यावी.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,कोल्हापूर.

प्रत- मुख्य सूचना फलक व सर्व विभाग प्रमुख यांना सूचना फलकावर लावणेसाठी .

२/- विभाग प्रमुख यांना कळविणेत येते की, सदरची सूचना तात्काळ विद्यार्थ्यांच्या उपलब्ध असलेल्या व्हॉटसॲप ग्रुपवर प्रदर्शित करण्यात यावी.

१) स्थापत्य २) यंत्र अभि ३) विद्युत अभि ४) माहिती तंत्रज्ञान ५) अणुविद्युत व दुरसंचारण ६) औद्योगिक अणुविद्युत ७) धातूशास्त्र ८) शर्करा तंत्र ९) मानव्यशास्त्र.

प्रत- विभाग प्रमुख माहिती तंत्रज्ञान यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी

२/- त्यांना कळविण्यात येते की, सदर नोटीस संस्थेच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी.

Scanned with OKEN Scanner